**Code No. 07**

Total No. of Questions : 74 ]

Total No. of Printed Pages : 4 ]

**June/July, 2011**

# MARATHI

Time : 3 Hours 15 Minutes ] [ Max. Marks : 100

**सूचना :** i) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

ii) उजवीकडील अंक प्रश्नांचे गुण दर्शवितात.

I. खालीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर निबंध लिहा : 1 × 10 = 10

1) माझा आवडता छंद

2) शाळेचा निरोप घेताना

3) मी मुख्याध्यापक झालो तर

4) आदर्श विद्यार्थी : माझी कल्पना

5) साक्षरतेचे महत्व.

II. अ) खालीलपैकी कोणत्याही **पाच** प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा : 5 × 1 = 5

6) गोविंदप्रभूंनी तिला कोणत्या कष्टातून मुक्त केले ?

7) फाल्गुनरावांच्या पत्नीचे नाव काय ?

8) मराठी संस्कृतीचे खरे विद्यापीठ कोठे आहे ?

9) भीमराव आंबेडकर यांचे खरे आडनाव कोणते ?

10) सानेगुरुजींची जगाकडे पाहण्याची दृष्टी कशी होती ?

11) यशवंतराव चव्हाण यांच्या मते आपल्या देशात भाषेच्या क्षेत्रात पहिली क्रांती कोणी केली ?

12) वेमन्नांची मातृभाषा कोणती ?

ब) खालीलपैकी कोणत्याही **एका** प्रश्नांचे सविस्तर उत्तर लिहा : 1 × 6 = 6

13) गोविंदप्रभूंच्या वागण्यातून आढळलेली संतत्वाची लक्षणे स्पष्ट करा.

14) फाल्गुनरावांच्या स्वभावाचे वर्णन करा.

15) वैद्यराज आदिनाथांच्या वैद्यक धर्माचे स्वरूप स्पष्ट करा.

[ Turn over

क) खालीलपैकी कोणत्याही **दोहोंवर** टीपा लिहा : 2 × 4 = 8

16) आंबेडकर मास्तर.

17) मोराबद्दलचा लेखकाचा भ्रमनिरास.

18) कविता व चित्र यांचे लेखकाने केलेले तुलनात्मक विवेचन.

19) व्यर्थ धडपडीतून दिसणारे निवेदकाचे व्यक्तिमत्व.

ड) खालीलपैकी कोणत्याही **दोहोंचे** ससंदर्भ स्पष्टीकरण करा : 2 × 3 = 6

20) ''राऊळ माय: राऊळ बापु:''

21) ''बलात्कार सर्वथैव न करावा''

22) ''हल्ली कोणाचा मत्सर वाटतो काय, देवाच्या क्षमेचा कधी अनुभव आला आहे का ?''

23) ''अस्पृश्यांच्या पोरांना मी संस्कृत शिकवणार नाही''

III. अ) खालीलपैकी कोणत्याही **पाच** प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे द्या : 5 × 1 = 5

24) परिस म्हणजे काय ?

25) कोणाची शिष्या म्हणून जनाबाईची ख्याती आहे ?

26) शहाणा कसा वागतो ?

27) रूक्मिणीच्या भावाच्या मनात काय होते ?

28) तेजाची लाट कुठून वाहते ?

29) वारा तिच्या कानाशी येताच काय म्हणाला ?

30) कवीचे प्राण कशात गुंतलेत ?

ब) खालीलपैकी कोणत्याही **एका** प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा : 1 × 6 = 6

31) समर्थांनी सांगितलेली चातुर्ये लक्षणे कोणती ?

32) श्रीमंत आणि गरीब यांचे जगणे या कवितेत कसे चित्रित झाले आहे ?

33) 'ठरविते किती मी' ह्या कवितेचा सारांश लिहा.

क) खालीलपैकी कोणत्याही **दोहोंवर** टीपा द्या : 2 × 4 = 8

34) श्रीकृष्ण-रूक्मिणी विवाहप्रसंग.

35) जगण्याचे भेसूरपण 'याही दिवसांतून' या कवितेतून सांगा.

36) अधिकाऱ्याची मानसिकता.

37) तणकटाचे बी.

ड) **खालीलपैकी कोणत्याही दोहोंचे** संदर्भासह स्पष्टीकरण करा : 2 × 3 = 6

38) ''सरिता ओघ जाय सिंधूसि मिळून
तैसा भेटे नारायण संतसंग ॥''

39) ''क्षितीजाच्या काळोखाला फुटे सुवर्णाचे पान
आकाशाच्या ओंजळीत पडे किरणाचे दान.''

40) ''अंगणी उभे हे किती तुझे सोबती,
ही तुझ्या सख्याची वाट, मला सांगती.''

41) ''कळत नाही का तुम्हाला,
पळालेत ते राखाडी रंगाचे ससे नजर चुकवून''

IV. **खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा :** 2 × 5 = 10

42) नानूभाईचे स्वभावचित्र रेखाटा.

43) बकसचे व्यक्तिचित्र रेखाटा.

44) 'कलिगड' कथेतील आई-लेकीचे नाते उलगडून दाखवा.

45) कथेतील नायिका स्वत:विषयी काय विचार करते ?

V. अ) खालीलपैकी कोणत्याही **एकावर** बातमी तयार करा. 1 × 5 = 5

46) चित्रपटगृहात दोन गटात मारामारी, तिचे पर्यवसान चित्रपटगृहाच्या मोडतोडीत.

47) तुमच्या कॉलेजच्या स्नेहसम्मेलनाची बातमी तयार करा.

48) पाण्यासाठी महिला मोर्चा.

ब) कंसातील सूचनेप्रमाणे प्रश्न सोडवा : 5 × 1 = 5

49) मी म्हैसूरला जाईन. ( काळ ओळखा )

50) वसंत ऋतू आला. कोकिळेस कंठ फुटला. ( संयुक्त वाक्य करा )

51) प्रारंभ, ज्ञान ( विरूद्धार्थी शब्द लिहा )

52) पवन, आकाश ( समानार्थी शब्द लिहा )

53) मुलाने गाईस बांधले ( प्रयोग ओळखा ).

क) खालील वाक्यप्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपायेग करा. 5 × 1 = 5

54) गळा दाटून येणे.

55) जमीन अस्मानाचा फरक असणे.

56) मन कळवळणे.

57) जिवाचा जळफळाट होणे.

58) डोळे उघडणे.

[ Turn over

ड) रूढ इंग्रजी शब्दांना पर्यायी मराठी शब्द लिहा : 5 × 1 = 5

59) कॉम्प्युटर

60) कारटून्स

61) हेडलाईन

62) ले-आऊट

63) सर्टिफिकीट.

इ) अधोरेखित शब्दांच्या विभक्ती ओळखा : 5 × 1 = 5

64) देवाहून कोण श्रेष्ठ आहे ?

65) मला फुलांचा रंग ओळखता आला नाही.

66) भारतवासीयांनो सुनामीग्रस्तांना मदत करा.

67) उदयला अभ्यासाची आवड आहे.

68) झाडास हात लावू नये.

VI. उतारा वाचून दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा : 5 × 1 = 5

''जगाचा केव्हा ना केव्हा तरी अंत होणार'' असे शास्त्रज्ञ म्हणतात. कवी असे म्हणणार नाही. अशा सुंदर जगाचा नाश करावयास परमेश्वर काही मूर्ख नाही. मला तर प्रलयाची कल्पनाच करता येत नाही. इतक्या जगातील सौंदर्यावर मी मोहून गेलो आहे, चोराच्या गुहेत शिरलेल्या आलीबाबासारखी माझी स्थिती झाली आहे. सर्वत्र अपरंपार संपत्ती भरलेली मला दिसत आहे. मी अगदी दिपून गेलो आहे. कशाला हात लावावा, अन् कशाला लावू नये असे मला झाले आहे. मी कांही हावरा नाही. जीवनाचा मला लोभ नाही पण ओढ आहे. चोहोकडून मला ते हाक मारते आहे. बोलवते आहे. अनंत हस्तानी त्याला मिठी मारून ते आपल्यात सामावून घ्यावे असे वाटते. शाळेतून सुटलेल्या पोरांच्या झुंडीप्रमाणे साऱ्या देह कणांना जीवनाकडे धूम ठोकावीशी वाटते. जीवनाचे हे वेड माझ्यामध्ये कसे आले ? लहानपणापासून निसर्गाची व इतिहासाची सोबत मला मिळाली. नद्या, डोंगर, झाडे, किल्ले, देवळे अन् पडके वाडे यांच्या संगतीत मी वाढलो. सकाळी उठलो की अंगावर सोनेरी उन्हे पांघरायची, रात्र झाली की अंगावर चांदण्याची निळी चादर ओढून अंगणात झोपी जावयाचे. उशाला अष्टौप्रहर शिवाजी महाराजांच्या पुरंदर किल्ल्याचा पहारा असे. शेजारी श्री सोपानदेवाची भक्तिवीणा सदैव वाजत राही.

69) शास्त्रज्ञांचे व कवीचे जगाच्या अंताबद्दल काय मत आहे ?

70) लेखक दिपून का गेला ?

71) कशाचा लोभ नाही पण ओढ आहे असे लेखक म्हणतात ?

72) लहानपणापासून कशाची सोबत मिळाली ?

73) समर्पक नाव द्या.

**किंवा**

74) स्नेहसंमेलनाप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून तुमच्या सरपंचांना निमंत्रित करणारे पत्र लिहा.